N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** विश्रांतवाडी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0463 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/09/2026 02:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/09/2026
**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/09/2026
**Time From (वेळेपासून):** 16:55 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:47 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/09/2026 **Time (वेळ):** 02:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/09/2026 02:30 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 6 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भैरवनगर, धानोरी,पुणे येथील धन्वंतरी,हस्पिटलमध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): निता चत्रभुज मिसाळ

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक,विभाग, पुणे,विश्रांतवाडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक,विभाग, पुणे,विश्रांतवाडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9822214414

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ड.ज्ञानेश्वर शिवराम चकोर | | | 1. शुभ गेटवे, ,विमानतळा शेजारी, विमाननगर, पुण,विश्रांतवाडी,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

तात्काळ

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि | संगणकाचे सुटे भाग | C VM Elite 32 GB C10 | 650.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | इलेक्ट्रॉनिक सामान | | U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16289 HC 260107 SM MADE | |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | C VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16289 HC 260107 SM MADE | 650.00 |
| 3 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | संगणकाचे सुटे भाग | C VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16289 HC 260107 SM MAD | 650.00 |
| 4 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | पांढया रंगाचा एफोर साईज कागद | 0.00 |
| 5 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | पाचशे दराच्या शंभर नोटा | 50,000.00 |
| 6 | इतर | घरगुती वस्तु | काळ्या रंगाचे एचपी कंपनीचे लेबल असलेल्या सक | 500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

52,450.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 27/09/2026.

मी निता चत्रभुज मिसाळ वय 47 वर्षे पद- पोलीस उपअधीक्षक नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा. क्र.9822214414.

आज रोजी समक्ष हजर राहून सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देते की, दि.21/09/2026 रोजी 13.20 वाजता मी कार्यालयीन कामकाज करीत असताना आमचे वरिष्ठ अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री सतिश वाळके यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार डॉ. दत्तात्रय जगन्नाथ खैरनार, वय 46 वर्षे, व्यवसाय - डॉक्टर, रा. धन्वंतरी हॉस्पिटल, सव्र्हे नं. 51, भैरव नगर, धानोरी, पुणे यांची ओळख करून दिली. तसेच त्यांची लोकसेवकाविरुध्द असलेली तक्रार घेवून त्याप्रमाणे पुढील पडताळणी व सापळा कारवाई करणेबाबत आदेशित केले. सदर कारवाईकामी सापळा पथकामध्ये मपोहवा 7901/गोरे, पोशि 1966/तावरे व शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक सपोफौ बर्गे असे मदतीकरीता दिले. तसेच वस्तु व सेवा कर भवन, येरवडा, पुणे कार्यालयास पत्रव्यवहार करून त्यांचेकडील श्री. दिनेश शिवाजी मोरे पद- राज्यकर निरीक्षक व श्री.दिपक दगडु गांडेकर पद- राज्यकर निरीक्षक असे दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून दिले ते 14.15 वाजता माझे कक्षामध्ये हजर झाले. मी तक्रारदार डॉ. खैरनार, दोन्ही पंच व सापळा पथक यांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. तक्रारदार डॉ. खैरनार यांची तोंडी तक्रार प्रथम ऐकून घेतल्यानंतर त्या अनुषंगाने करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्याकरीता दोन्ही पंचांनी सहमती दिली. मी तक्रारदार व

दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडून करण्यात येणा-या सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर सदर कारवाईकामी पंच क्र.1 म्हणून श्री.दिनेश मोरे व पंच क्र.2 श्री. दिपक गांडेकर काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार डॉ. खैरनार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची लेखी तक्रार लिहून दिली ती पुढीलप्रमाणे-

"मी वरिलप्रमाणे अर्जदार असून वर नमूद पत्त्यावर माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझे शिक्षण बीएएमएस, एम डी. असे असुन गेली 12 वर्षापासुन मी माझे वरील धन्वंतरी हॉस्पिटल, सव्हे नं. 51, भैरव नगर, धानोरी, पुणे येथे वैद्यकिय प्रॅक्टीस करीत आहे. माझा वैद्यकिय रजिस्ट्रेशन नंबर I40941A1 असा असुन माझ्या हॉस्पिटलचा रजिस्ट्रेशन नंबर LCBP 2014- 00019 असा आहे.

दिनांक 18/09/2026 रोजी सकाळी 11.30 ते संध्याकाळी 05.00 वाजेदरम्यान डॉ. ज्ञानेश्वर चकोर, वैद्यकिय अधिकारी, नगर रोड क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका हे सरप्राईज व्हिजीट सांगुन माझे धन्वंतरी हॉस्पिटल तपासणी साठी आले होते. तपासणी दरम्यान मला डॉ. चकोर यांनी असे सांगितले की, तुमच्या व तुमच्या हॉस्पिटलविरुद्ध चव्हाण नावाच्या व्यक्तीने तक्रार दिलेली आहे. त्यावेळी मी त्यांना काय तक्रार दिली ती दाखवा असे विचारले असता त्यांनी मला त्यांचे मोबाईलमधील तक्रार मला न दाखवता स्वत: वाचुन दाखवली. त्यामध्ये तुमच्या हॉस्पिटलमध्ये गर्भपातचे ऑपरेशन केले जाते, हस्टिपटलच्या रेकॉर्डमध्ये अनियमितता आहे, पेशंटकडून वेगवेगळी बिले घेतली जातात इत्यादी आरोप असल्याचे सांगितले. नंतर त्यांनी संपुर्ण वेळ हॉस्पिटलची तपासणी केली असता त्यांनी आयपीडी/ ओपीडी तसेच ओटी रजिस्टर, डिलेव्हरी रजिस्टर इत्यादी रजिस्टरमध्ये अनियमितता आहे. त्याचे निराकरण करावे लागेल नाहीतर मी तुमचे हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी तसा अहवाल वरिष्ठांना पाठवुन देईल आणि जर तुम्हाला रजिस्ट्रेशन रद्द व्हावे असे वाटत नसेल तर तुम्हाला 20 लाख रुपये द्यावे लागतील असे मला सांगितले. त्यानंतर त्यांना मी विनंती केली की, मी एवढे पैसे सध्या देवू शकत नाही काहीतरी मार्ग काढा. त्यावर ते मला म्हणाले की, आत्ता काही तरी द्या बाकी मी सोमवारी विचार करुन सांगतो. त्यामुळे मी घाबरुन नाईलाजाने लगेच माझ्या खिशात होते तेवढे 30 हजार रुपये रोख त्यांचे हातात दिले. त्यावेळी ते मला म्हणाले की बाकी पैशांची सोय करुन ठेवा मी सोमवारी संध्याकाळी येतो असे म्हणुन ते पैसे घेवुन निघुन गेले.

डॉ. ज्ञानेश्वर चकोर, वैद्यकिय अधिकारी, नगर रोड क्षेत्रीय कार्यालय हे माझ्या हॉस्पिटलविरुध्द असलेल्या तक्रार अर्जामध्ये माझ्या हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठीचा अहवाल न पाठविण्याकरीता माझ्याकडे मागणी करीत असलेली रु.20,00,000/- (वीस लाख रुपये) ही कोणतीही शासकीय फी नसून ती लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री आहे. ती त्यांना देण्याची माझी इच्छा नाही. डॉ.चकोर हे आज दि.21/09/2026 रोजी सायंकाळी माझ्या वरिल नमूद हॉस्पिटलमध्ये भेटण्यासाठी येणार आहेत. त्यावेळी आपल्या विभागामार्फत त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे. तसेच डॉ.ज्ञानेश्वर चकोर व माझ्यात यापुर्वीचे कोणतेही आर्थिक हितसंबंध किंवा पुर्व वैमनस्य नाही." सदर तक्रार लिहून झाल्यानंतर ती वाचून मी व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या.

लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांना त्यांचे धन्वंतरी हॉस्पिटल, धानोरी येथे भेटण्यास येणार असल्याने तक्रारदार व दोन्ही पंचांची निवेदने ध्वनिमुद्रीत करण्यासाठी व्हीएम एलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले हे शासकीय व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तसेच निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी व्हिडीओ रेकॉर्डींग करावयाचे असल्याने व्हीएम एलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले हे शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये घातले. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान घडणा-या संपुर्ण घटनेचे स्पाय कॅमे-याद्वारे व्हिडीओ चित्रिकरण करावयाचे असल्याने एक 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्यांचे पुढील बाजूस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले ते लाचलुचप प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडील शर्टच्या स्पाय कॅमेरा डिव्हॉईसमध्ये घातले.

त्यानंतर माझे सुचनेवरुन 16.15 वाजता पोशि तावरे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांची पडताळणी निवेदने व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी पोशि कुमकर यांनी शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ चित्रिकरण केले. त्यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तक्रारदार डॉ.खैरनार यांनी त्यांचे तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे लोकसेवक डॉ. चकोर हे त्यांचे धानोरी येथील धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये भेटण्यास येणार असल्याने दि.21/09/2026 रोजीचे 16.55 ते 20.22 वाजता दरम्यान तसेच

दि.22/09/2026 रोजीचे 12.10 ते 20.52 वाजता दरम्यान पडताळणी कारवाई आजमाविण्यात आली परंतु लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांचे हॉस्पिटलला भेटण्यास न आल्याने सदर दोन्ही दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत दि.21/09/2026 व दि.22/09/2026 रोजीचे सविस्तर पडताळणी स्थगित पंचनामे करण्यात आले आहेत.

लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांना त्यांचे हॉस्पिटलमध्ये भेटण्याकरीता न आल्याने दि.24/09/2026 रोजी तक्रारदार व पंच क्र.1 मोरे यांना लोकसेवक यांचे नगररोड येथील क्षेत्रिय कार्यालयात पाठवून पडताळणी कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार दि.24/09/2026 रोजी 11.30 वाजता पर्यंत ला. प्र.वि. पुणे कार्यालय येथे मी, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे उपस्थित होतो. सापळा पथकामध्ये मपोहवा गोरे यांचे ऐवजी पोशि 9175/कुमकर यांचा समावेश करण्यात आलेला होता. त्यानंतर 12.00 वाजता तक्रारदार डॉ. खैरनार हे त्यांचे चारचाकी वाहन महिंद्रा स्कॉर्पिओ एनक्र.एम एच 12 डब्ल्यु ई 1779ने ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे उपस्थित झाले. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी डॉ. खैरनार व पंच क्र.1 श्री मोरे व पंच क्र.2 श्री गांडेकर यांची पडताळणी निवेदने 12.26 वाजता ध्वनिमुद्रीत केली. त्यावेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडे दिलेल्या शासकीय व्हिडीओ रेकॉर्डद्वारे सदर निवेदनांचे व्हिडीओ चित्रिकरण केले आहे. त्यानंतर मी ला. प्र.वि. पुणे कार्यालयाकडील स्पाय कॅमेरा असलेला शर्ट तक्रारदार फिर्यादी जबाब दि. 27/09/2026.

मी निता चत्रभुज मिसाळ वय 47 वर्षे पद- पोलीस उपअधीक्षक नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे मोबा. क्र.9822214414.

आज रोजी समक्ष हजर राहून सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देते की, दि.21/09/2026 रोजी 13.20 वाजता मी कार्यालयीन कामकाज करीत असताना आमचे वरिष्ठ अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री सतिश वाळके यांनी त्यांचे कक्षात बोलावून तक्रारदार डॉ. दत्तात्रय जगन्नाथ खैरनार, वय 46 वर्षे, व्यवसाय – डॉक्टर, रा. धन्वंतरी हॉस्पिटल, सव्र्हे नं. 51, भैरव नगर, धानोरी, पुणे यांची ओळख करून दिली. तसेच त्यांची लोकसेवकाविरुध्द असलेली तक्रार घेवून त्याप्रमाणे पुढील पडताळणी व सापळा कारवाई करणेबाबत आदेशित केले. सदर कारवाईकामी सापळा पथकामध्ये मपोहवा 7901/गोरे, पोशि 1966/तावरे व शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109 व त्यावरील चालक सपोफौ बर्गे असे मदतीकरीता दिले. तसेच वस्तु व सेवा कर भवन, येरवडा, पुणे कार्यालयास पत्रव्यवहार करून त्यांचेकडील श्री. दिनेश शिवाजी मोरे पद- राज्यकर निरीक्षक व श्री.दिपक दगडु गांडेकर पद- राज्यकर निरीक्षक असे दोन पंच साक्षीदार उपलब्ध करून दिले ते 14.15 वाजता माझे कक्षामध्ये हजर झाले. मी तक्रारदार डॉ. खैरनार, दोन्ही पंच व सापळा पथक यांची आपसात ओळख करून दिली व ओळख करून घेतली. तक्रारदार डॉ. खैरनार यांची तोंडी तक्रार प्रथम ऐकून घेतल्यानंतर त्या अनुषंगाने करण्यात येणा-या पुढील पडताळणी व सापळा कारवाईकामी पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्याकरीता दोन्ही पंचांनी सहमती दिली. मी तक्रारदार व दोन्ही पंचांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडून करण्यात येणा-या सापळा कारवाईबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर सदर कारवाईकामी पंच क्र.1 म्हणून श्री.दिनेश मोरे व पंच क्र.2 श्री. दिपक गांडेकर काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार डॉ. खैरनार यांनी दोन्ही पंचासमक्ष त्यांची लेखी तक्रार लिहून दिली ती पुढीलप्रमाणे-

“मी वरिलप्रमाणे अर्जदार असून वर नमूद पत्यावर माझे कुटुंबासह राहण्यास आहे. माझे शिक्षण बीएएमएस, एम डी. असे असुन गेली 12 वर्षापासुन मी माझे वरील धन्वंतरी हॉस्पिटल, सव्र्हे नं. 51, भैरव नगर, धानोरी, पुणे येथे वैद्यकिय प्रॅक्टीस करीत आहे. माझा वैद्यकिय रजिस्ट्रेशन नंबर I40941A1 असा असुन माझ्या हॉस्पिटलचा रजिस्ट्रेशन नंबर LCBP 2014- 00019 असा आहे.

दिनांक 18/09/2026 रोजी सकाळी 11.30 ते संध्याकाळी 05.00 वाजेदरम्यान डॉ. ज्ञानेश्वर चकोर, वैद्यकिय अधिकारी, नगर रोड क्षेत्रीय कार्यालय, पुणे महानगरपालिका हे सरप्राईज व्हिजीट सांगुन माझे धन्वंतरी हॉस्पिटल तपासणी साठी आले होते. तपासणी दरम्यान मला डॉ. चकोर यांनी असे सांगितले की, तुमच्या व तुमच्या हॉस्पिटलविरुद्ध चव्हाण नावाच्या व्यक्तीने तक्रार दिलेली आहे. त्यावेळी मी त्यांना काय तक्रार दिली ती दाखवा असे विचारले असता त्यांनी मला त्यांचे मोबाईलमधील तक्रार मला न दाखवता स्वत: वाचुन दाखवली. त्यामध्ये तुमच्या हॉस्पिटलमध्ये गर्भपातचे ऑपरेशन केले जाते, हस्टिपटलच्या रेकॉर्डमध्ये अनियमितता आहे, पेशंटकडून वेगवेगळी बिले घेतली जातात इत्यादी आरोप असल्याचे सांगितले. नंतर त्यांनी संपुर्ण वेळ हॉस्पिटलची तपासणी केली असता त्यांनी आयपीडी/ ओपीडी तसेच ओटी रजिस्टर, डिलेव्हरी रजिस्टर इत्यादी रजिस्टरमध्ये अनियमितता आहे. त्याचे निराकरण करावे लागेल नाहीतर मी तुमचे हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी तसा अहवाल वरिष्ठांना पाठवुन देईल आणि जर तुम्हाला रजिस्ट्रेशन रद्द व्हावे असे वाटत नसेल तर तुम्हाला 20 लाख रुपये द्यावे लागतील असे मला सांगितले. त्यानंतर त्यांना मी विनंती केली की, मी एवढे पैसे सध्या देवू शकत नाही काहीतरी मार्ग काढा.

त्यावर ते मला म्हणाले की, आत्ता काही तरी द्या बाकी मी सोमवारी विचार करुन सांगतो. त्यामुळे मी घाबरुन नाईलाजाने लगेच माझ्या खिशात होते तेवढे 30 हजार रुपये रोख त्यांचे हातात दिले. त्यावेळी ते मला म्हणाले की बाकी पैशांची सोय करुन ठेवा मी सोमवारी संध्याकाळी येतो असे म्हणुन ते पैसे घेवुन निघुन गेले.

डॉ. ज्ञानेश्वर चकोर, वैद्यकिय अधिकारी, नगर रोड क्षेत्रीय कार्यालय हे माझ्या हॉस्पिटलविरुध्द असलेल्या तक्रार अर्जामध्ये माझ्या हॉस्पिटलचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठीचा अहवाल न पाठविण्याकरीता माझ्याकडे मागणी करीत असलेली रु.20,00,000/- (वीस लाख रुपये) ही कोणतीही शासकीय फी नसून ती लाच रक्कम असलेबाबत माझी खात्री आहे. ती त्यांना देण्याची माझी इच्छा नाही. डॉ.चकोर हे आज दि.21/09/2026 रोजी सायंकाळी माझ्या वरिल नमूद हॉस्पिटलमध्ये भेटण्यासाठी येणार आहेत. त्यावेळी आपल्या विभागामार्फत त्यांचे विरुध्द कायदेशिर कारवाई होणेस विनंती आहे. तसेच डॉ.ज्ञानेश्वर चकोर व माझ्यात यापुर्वीचे कोणतेही आर्थिक हितसंबंध किंवा पुर्व वैमनस्य नाही." सदर तक्रार लिहून झाल्यानंतर ती वाचून मी व दोन्ही पंचांनी त्यावर सहया केल्या.

लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांना त्यांचे धन्वंतरी हॉस्पिटल, धानोरी येथे भेटण्यास येणार असल्याने तक्रारदार व दोन्ही पंचांची निवेदने ध्वनिमुद्रीत करण्यासाठी व्हीएम एलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले हे शासकीय व्हॉईस रेकॉर्डरमध्ये घातले. तसेच निवेदन ध्वनिमुद्रीत करतेवेळी व्हिडीओ रेकॉर्डीग करावयाचे असल्याने व्हीएम एलाईट कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजुस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले हे शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये घातले. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान घडणा-या संपुर्ण घटनेचे स्पाय कॅमे-याद्वारे व्हिडीओ चित्रिकरण करावयाचे असल्याने एक 32 जीबी क्षमतेचे मेमरीकार्ड त्याचे पुढील बाजूस C- VM Elite 32 GB C10 U1 V10 micro SD HC I व त्याचे मागील बाजुस MM32GC10YSB16-289 HC 260107 SM MADE IN TAIWAN EVMTF/32GB0126SE असे छापलेले ते लाचलुचप प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडील शर्टच्या स्पाय कॅमेरा डिव्हॉईसमध्ये घातले.

त्यानंतर माझे सुचनेवरून 16.15 वाजता पोशि तावरे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांची पडताळणी निवेदने व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी पोशि कुमकर यांनी शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ चित्रिकरण केले. त्यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास पडताळणी कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तक्रारदार डॉ.खैरनार यांनी त्यांचे तक्रारीमध्ये नमूद केल्याप्रमाणे लोकसेवक डॉ. चकोर हे त्यांचे धानोरी येथील धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये भेटण्यास येणार असल्याने दि.21/09/2026 रोजीचे 16.55 ते 20.22 वाजता दरम्यान तसेच दि.22/09/2026 रोजीचे 12.10 ते 20.52 वाजता दरम्यान पडताळणी कारवाई आजमाविण्यात आली परंतु लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांचे हॉस्पिटलला भेटण्यास न आल्याने सदर दोन्ही दिवशीची पडताळणी कारवाई स्थगित करण्यात आली. सदरबाबत दि.21/09/2026 व दि.22/09/2026 रोजीचे सविस्तर पडताळणी स्थगित पंचनामे करण्यात आले आहेत.

लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांना त्यांचे हॉस्पिटलमध्ये भेटण्याकरीता न आल्याने दि.24/09/2026 रोजी तक्रारदार व पंच क्र.1 मोरे यांना लोकसेवक यांचे नगररोड येथील क्षेत्रिय कार्यालयात पाठवून पडताळणी कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानुसार दि.24/09/2026 रोजी 11.30 वाजता पर्यंत ला. प्र.वि. पुणे कार्यालय येथे मी, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथक असे उपस्थित होतो. सापळा पथकामध्ये मपोहवा गोरे यांचे ऐवजी पोशि 9175/कुमकर यांचा समावेश करण्यात आलेला होता. त्यानंतर 12.00 वाजता तक्रारदार डॉ. खैरनार हे त्यांचे चारचाकी वाहन महिंद्रा स्कॉर्पिओ एनक्र.एम एच 12 डब्ल्यु ई 1779ने ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे उपस्थित झाले. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे यांनी डॉ. खैरनार व पंच क्र.1 श्री मोरे व पंच क्र.2 श्री गांडेकर यांची पडताळणी निवेदने 12.26 वाजता ध्वनिमुद्रीत केली. त्यावेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडे दिलेल्या शासकीय व्हिडीओ रेकॉर्डद्वारे सदर निवेदनांचे व्हिडीओ चित्रिकरण केले आहे. त्यानंतर मी ला. प्र.वि. पुणे कार्यालयाकडील स्पाय कॅमेरा असलेला शर्ट तक्रारदा यांना परिधान करण्यासाठी दिली असता तो त्यांनी परिधान केला. मी पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार डॉ. खैरनार, दोन्ही पंच साक्षीदार व सापळा पथकास सविस्तर सुचना दिल्या.

सुचना देवून झाल्यानंतर तक्रारदार डॉ. खैरनार यांना त्यांचे हॉस्पिटल येथून त्यांची नर्स नामे अर्चना वर्मा हिचा तिचे 9130466757 या क्रमांकावरून डॉ. खैरनार यांचे 9881444156 या मोबाईल क्रमांकावर 12.46 वाजता फोन आला व त्यांनी लोकसेवक डॉ.चकोर हे तपासणीकरीता तक्रारदार यांचे धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये आल्याची

माहिती तक्रारदार यांना दिली. त्यानंतर अर्चना नर्स यांचा पुन्हा 12.51 वाजता तक्रारदार यांना फोन आला त्यावेळी लोकसेवक डॉ. चकोर त्यांचे फोनवरून तक्रारदार यांचेशी बोलले असता तक्रारदार यांनी अध्र्या तासामध्ये हॉस्पिटलला येतो असे लोकसेवक चकोर यांना सांगितले. लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांचे हॉस्पिटलला तपासणी करीता आलेले असल्याने त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. व्हॉईस रेकॉर्डर व स्पाय कॅमेरा डिव्हॉईसचा बॅटरी बॅकअप राहण्याकरीता तक्रारदार डॉ. खैरनार यांना ला.प्र.वि. पुणे कार्यालयातुन रवाना न करता त्यांचे हॉस्पिटल जवळ जावून पडताळणी कारवाईकरीता रवाना करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्याप्रमाणे तक्रारदार यांचे चारचाकी वाहनामध्ये पोशि तावरे, पोशि कुमकर, पंच क्र.1 श्री मोरे व तक्रारदार असे 12.53 वाजता रवाना झाले. त्यांचे मागोमाग मी व पंच क्र.2 असे शासकीय वाहन क्र.एमएच 12 युसी 4109सह सापळा कारवाईकामी आवश्यक असलेल्या साहित्यसह रवाना झालो व धानोरी परिसरामध्ये जावून थांबून राहिलो.

तक्रारदार विश्रांतवाडी परिसरामध्ये पोहचले असता 13.15 वाजता अर्चना नर्स यांनी पुन्हा फोन करून लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांचे हॉस्पिटलमधून जवळ असलेल्या वैभव हॉस्पिटल येथे तपासणी करीता गेले असून ते परत येणार असल्याचे सांगितले. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून पोशि तावरे, पोशि कुमकर असे तक्रारदार व पंच क्र.1 यांचे सोबत तक्रारदार यांचे धन्वंतरी हॉस्पिटलला 13.30 वाजता पोहचले. पंच क्र.1 यांचे समक्ष तक्रारदार यांनी त्यांचा मोबा.क्र.9881444156 वरून लोकसेवक डॉ.चकोर यांचा 9689931962 या मोबाईल क्रमांकावर स्पीकर ऑन करून 13.44 वाजता कॉल केला हॉस्पिटलला पोहचल्याबाबतची माहिती दिली असता लोकसेवक चकोर यांनी पाच मिनीटात आलो असे सांगितले. त्यामुळे पोशि तावरे यांनी 13.50 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांना लावला तसेच पोशि कुमकर यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या शर्टच्या स्पाय कॅमे-याचे बटन चालू केले व पंच क्र.1 मोरे यांचेसोबत तक्रारदार यांचे ओपीडी कक्षाकडे पाठविले. सुमारे एक तास वाट पाहिली परंतु लोकसेवक डॉ. चकोर हे न आल्याने तक्रारदार यांचा व्हॉईस रेकॉर्डर 15.06 वाजता बंद करण्यात आला. त्यानंतर मी दिलेल्या सुचनेवरून तक्रारदार यांनी पुन्हा 15.35 वाजता लोकसेवक चकोर यांना फोन केला असता त्यांनी ऑन दी वे असल्याचे सांगितले. त्यामुळे पोशि तावरे यांनी पुन्हा 15.44 वाजता व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांना लावला. यावेळी स्पाय कॅमे-याची बॅटरी संपल्याने तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डरसह पंच क्र.1 मोरे यांचेसोबत तक्रारदार यांचे ओपीडी कक्षाकडे रवाना केले. त्यानंतर सुमारे तीन तासांनी ते दोघे परत 18.45 वाजता परत आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे हॉस्पिटलजवळ गेलो. तक्रारदार, पंच क्र.1, पोशि तावरे व पोशि कुमकर यांना शासकीय वाहनामध्ये बसविले. त्यानंतर मी पंच क्र.1 यांना घडलेली हकिकत विचारली असता त्यांनी पंच क्र. 2 यांचेसमक्ष सांगितले की, ते व तक्रारदार असे तक्रारदार यांचे ओपीडी कक्षामध्ये गेल्यानंतर लोकसेवक डॉ. चकोर यांनी पंच क्र.1 यांचेबाबत विचारणा करून त्यांना बाहेर थांबण्यास सांगितल्याने ते तक्रारदार यांचे ओपीडी कक्षाबाहेर थांबून होते. परंतु दरवाज्याची काच पारदर्शक असल्याने त्यांनी तक्रारदार व लोकसेवक यांचेती बोलणे पाहिले असल्याचे सांगितले. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, मी व पंच क्र.1 असे माझ्या ओपीडी कक्षामध्ये गेलो असता डॉ. चकोर यांनी पंच क्र.1 यांना बाहेर पाठविले. त्यानंतर लोकसेवक डॉ. चकोर व माझेत माझ्या हॉस्पिटल विरुध्द चव्हाण नावाचे इसमाने केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने चर्चा झाली. त्या दरम्यान मी त्यांना त्यांनी मागितलेल्या वीस लाख रुपयांबाबत बोललो असता डॉ. चकोर यांनी वीस लाख रुपयांबाबत काहीही बोललो नसल्याचे सांगितले. त्यानंतर डॉ. चकोर यांनी आमचे हॉस्पिटलचे रजिस्टरची तपासणी चालु केली. मध्येच लोकसेवक डॉ. चकोर यांची मोबाईलद्वारे त्यांचे वरिष्ठांशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मिटींग सुरू झाली ती बराच वेळ चालली. मध्ये मध्ये माझ्या पत्नीचे येणे जाणे सुरू होते. लोकसेवक चकोर यांची मिटींग संपल्यानंतर मी पुन्हा माझ्या हॉस्पिटल विरुध्द चव्हाण यांनी केलेल्या तक्रार अर्जाबाबत विचारणा केली व त्याअनुषंगाने दिलेल्या पैशाचे संदर्भाने मी डॉ. चकोर यांना "कारण त्या दिवशी मी पण खिशात ठेवल काय होतं ते...तीस-चाळीस ते तीस-चाळीस ते काय अंदाजे दिले..तुम्हाला चाळीस हजार" असे बोललो असता त्यावर लोकसेवक डॉ. चकोर यांनी "नाई नाई पंधरा हजार होते" असे बोलून त्यांनी माझ्याकडून यापुर्वी रु.15,000/- स्वीकारल्याचे मान्य केले. त्यानंतर झालेल्या चर्चे दरम्यान मी डॉ. चकोर यांना "कसं करायच तुम्हीच सांगा" अशी विचारणा केली असता त्यांनी "सांगतो ना नोटीस दयायला लावतो" असे बोलून आपल्या उजव्या हाताचा अंगठा तर्जणीवर घासून पैशाबाबत इशा-याने मला विचारणा केली असता मी त्यांना "कसं किती" असे विचारले लोकसेवक डॉ. चकोर यांनी "अं...पन्नास देऊन टाका साहेबाला" असे मला सांगितले त्याची खात्री करण्यासाठी मी पुन्हा लोकसेवक डॉ.चकोर यांना "पन्नास हजार ना" असे विचारले असता त्यांनी "हम्म" असे बोलून डॉ. चकोर यांनी त्यांचे साहेबांकरीता रु.50,000/- लाचेची मागणी माझ्याकडे केली. त्यानंतर आणखी थोडी

चर्चा करून मी त्यांना "आपल सहा महिन्याला कराव लागणार का?" अशी विचारणा केली असता त्यांनी मला "नाई आपल सहा महिन्याच पण आता याच्यात...तुम्हाला काय दयायच दया...तुम्ही पंधरा दिल्यात"असे मला सांगितले व लाचेची रक्कम परवा म्हणजेच दि.26/09/2026 रोजी लोकसेवक हे धानोरीत तपासणी करीता आल्यानंतर दया असे सांगितले. त्यानंतर आणखी चर्चा करून लोकसेवक डॉ.चकोर निघुन गेले अशी हकिकत तक्रारदार डॉ. खैरनार यांनी सांगितली. त्यानंतर मी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरीकार्डमध्ये पडताळणी दरम्यान ध्वनिमुद्रीत झालेल्या फाईल्समधील संभाषण फास्ट फॉरवर्ड - बॅक करून ऐकून पंच क्र.1 व तक्रारदार डॉ.खैरनार यांनी सांगितलेली हकिकत बरोबर असल्याची खात्री केली. त्यावेळी तक्रारदार डॉ.खैरनार यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, त्यांना लोकसेवक डॉ. चकोर यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांचे साहेबांकरीता नसून त्यांचे स्वत: साठी केल्याची त्यांची खात्री आहे.

एकंदरीत दि.24/09/2026 रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक डॉ. चकोर यांनी तक्रारदार यांचे हॉस्पिटलविरुध्द चव्हाण नावाचे व्यक्तीने केलेल्या तक्रार अर्जावरून कमीतकमी कारवाई करण्यासाठी साहेबांचे नाव सांगुन त्यांचे स्वत:साठी रु.50,000/- लाचेची मागणी तक्रारदार यांचेकडे केली तसेच सदर अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांचेकडून यापुर्वी रु.15,000/- लाच रक्कम स्वीकारल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर लाचेची रक्कम दि.26/09/2026 रोजी तक्रारदार यांचे हॉस्पिटल येथे स्वीकारण्यास येणार असल्याने दि. 26/09/2026 रोजी सापळा कारवाई आजमाविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदरबाबत दि.24/09/2026 रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्याप्रमाणे मी दिलेल्या सुचनेवरून दि.26/09/2026 रोजी सकाळी 10.00 वाजता दोन्ही पंच, तक्रारदार डॉ. खैरनार त्यांचे नमूद चारचाकी वाहनासह व सापळा पथक हजर झाले. यावेळी सापळा पथकामध्ये चालक बर्गे यांचे ऐवजी चालक पोहवा 4337/कदम यांना सामील करण्यात आले होते. हजर होताच तक्रारदार यांनी मला सांगितले की, त्यांना सकाळी 09.29 वाजता लोकसेवक चकोर यांचा व्हॉटसप कॉल आला होता व ते आज सकाळी 10.30 वाजता त्यांचे हॉस्पिटलला तपासणीसाठी येणार आहेत. त्यामुळे मी तक्रारदार यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे बचतीमधील भारतीय चलनातील रु.500/-दराच्या एकुण 100 नोटा (एकुण रु.50,000/-) दोन्ही पंचासमक्ष माझे समोर हजर केल्या. सदर नोटांचे नंबर पोशि तावरे यांनी संगणकावर टंकलिखीत करून घेतले व तो कागद पंच क्र.2 यांचेकडे देण्यात आला. त्यावेळी मी दिलेल्या सुचनेवरून मपोशि 7934/माकर यांनी तक्रारदार व दोन्ही पंचांना अँथ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म समजावून सांगितले की, अँथ्रासिन पावडर लागलेल्या वस्तु वर नेहमीच्या प्रकाशामध्ये पाहणी केली असता कोणतीही चकाकी दिसून येते नाही परंतु त्याच वस्तुवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचा प्रकार टाकला असता फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून येते असे सांगुन मपोशि माकर यांनी तक्रारदार यांनी हजर केलेल्या लाच रकमेस अँथ्रासिन पावडर लावली व त्याबाबतची प्रात्यक्षिके करून दाखविली. तसेच सदर अँथ्रासिन पावडर लावलेली लाच रक्कम मपोशि माकर यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यावेळी मी तक्रारदार यांना सुचना दिली की, जो पर्यंत लाच रक्कम लोकसेवकास देण्याची वेळ येणार नाही तो पर्यंत त्या रक्कमेस हात लावू नये तसेच लोकसेवक चकोर यांचेकडून लाच रकमेचा स्वीकार झाल्यानंतर तुम्ही तुमच्या डाव्या हाताने पॅन्टचे खिशातील हात रूमाल काढून तो तोंडावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत इशारा करावा. त्यानंतर मी तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाइचे अनुषंगाने सविस्तर सुचना दिल्या.

त्यानंतर माझ्या सुचनेवरून मपोहवा गोरे यांनी तक्रारदार श्री खैरनार व दोन्ही पंचाची पडताळणी निवेदने 11.07 वाजता ध्वनिमुद्रीत केली. सदरवेळी पोशि कुमकर यांनी शासकीय व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ चित्रिकरण केले. त्या दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे हॉस्पिटलवरून अर्चना नर्स यांचे दोन मिस कॉल येवून गेले. लोकसेवक डॉ. चकोर हे तक्रारदार यांचे हॉस्पिटलला आले असण्याची शक्यता असल्याने तक्रारदार यांनी अर्चना नर्स यांना फोन केला असता त्यांनी लोकसेवक चकोर हे त्यांचे हॉस्पिटलला आले असल्याची माहिती दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी पुन्हा अर्चना नर्स यांना दोन फोन कॉल केले व त्यांचे फोनवरून लोकसेवक डॉ. चकोर यांचेशी बोलणे केले त्यामध्ये तक्रारदार यांनी वीस-पंचवीस मिनिटामध्ये हॉस्पिटलला येतो असे तक्रारदार यांना सांगितले. त्यानंतर मी स्पाय कॅमेरा असलेला शर्ट तक्रारदार यांना दिला असता तक्रारदार यांनी तो परिधान केला. त्यानंतर मी सुचना दिल्याप्रमाणे पोशि तावरे, पोशि कुमकर, पंच क्र.1 व तक्रारदार असे तक्रारदार यांचे महिंद्रा स्कार्पिओ एनक्र.एम एच 12 डब्ल्यु ई 1779ने या चारचाकी वाहनाने 11.20 वाचे सुमारास ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथून रवाना झाले. त्यांचे मागोमाग मी, पंच क्र.2 श्री गांडेकर व मपोहवा गोरे असे शासकीय वाहनाने रवाना होवून तक्रारदार यांचे धानोरी येथील धन्वंतरी हॉस्पिटलचे पुर्वी सुमारे शंभर मीटर थांबून शासकीय वाहन आडोशाला पार्क करून आम्ही सर्व वाहनातुन उतरून धन्वंतरी हॉस्पिटलचे आजु-बाजुस संशय येणार नाही अशा रितीने सापळा लावून थांबलो.

त्याच वेळी तक्रारदार व पंच क्र.1 श्री मोरे असे तक्रारदार यांचे हॉस्पिटलचे इमारतीमध्ये गेले. त्यावेळी मी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोशि कुमकर हे हॉस्पिटलचे बाहेर व पोशि तावरे हे थोडा वेळा हॉस्पिटलचे बाहेर व त्यानंतर रुग्ण म्हणून हॉस्पिटलचे वेटींगरुममध्ये बसून राहिले.

त्यानंतर सुमारे दोन तासांनी पोशि तावरे यांनी मला व्हाटसप मॅसेजद्वारे लाच रक्कम स्वीकारल्याचे कळविले असता मी सापळा पथकासह तक्रारदार डॉ. खैरनार यांचे हॉस्पिटलचे ओपीडी कक्षात गेले त्यावेळी पोशि तावरे यांनी लोकसेवक चकोर यांचे दोन्ही हात मनगटाजवळ घट पकडून त्यांना थांबवून ठेवले होते. त्यावेळी मपोहवा गोरे यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 13.47 वाजताची होती. त्यावेळी पोशि कुमकर यांनी तक्रारदार यांनी परिधान केलेल्या स्पाय कॅमेरा डिव्हॉईसचे बटन बंद करून त्यांचेकडील व्हिडीओ रेकॉर्डरद्वारे व्हिडीओ चित्रिकरण सुरू केले. त्यावेळी मी लोकसेवक चकोर यांना माझे शासकीय ओळखपत्र दाखवून सर्वांची ओळख करून दिली व त्यांचे विरुध्द झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली असता सदरेवळी ते घाबरलेल्या अवस्थेमध्ये होते. त्यानंतर सदर ओपीडी कक्षाच्या लाईट बंद करून मी, दोन्ही पंचांनी व सापळा पथकातील अंमलदार यांनी आमचे हात व कपडयांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी करून दिली असता कोणाचेही हातास अगर कपडयास अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर सदर कक्षामध्ये लाईट चालू करून मी लोकसेवक चकोर यांना तक्रारदार यांचेकडून स्वीकारलेली लाच रक्कम कोठे ठेवली अशी विचारणा करता ते टाळाटाळ करून लागले. त्यावेळी बाजुला थांबलेले पंच क्र.1 श्री मोरे व तक्रारदार यांनी सांगितले की, लोकसेवक चकोर यांनी त्यांचे डाव्या हातावर पांढ-या रंगाचा एफोर साईज कागद ठेवून त्यावर लाच रक्कम स्वीकारून ती त्या कागदामध्ये दुमडून करून ती त्यांचेसोबत असलेल्या काळया रंगाचे एचपी कंपनीचे लेबल असलेल्या सॅकच्या पहिल्या कप्प्यामध्ये ठेवली असल्याचे सांगितले. त्यावेळी मी पुन्हा लोकसेवक चकोर यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचेकडील सदर सॅकच्या पहिल्या कप्प्याची चैन उघडून त्यामध्ये ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी मी दिलेल्या सुचनेवरून पंच क्र.1 श्री मोरे यांनी सदर लाच रक्कम ठेवलेला कागद व लाचेची रक्कम सॅकमधून बाहेर काढून तसेच पंच क्र.2 श्री गांडेकर यांनी त्यांचेकडील नोट नंबर लिहलेला कागद व हस्तगत केलेल्या नोटांवरील नंबर पंच क्र.1 श्री मोरे यांचे मदतीने तपासून पाहिले असता ते तंतोतंत जुळून आले. त्यानंतर मी सदर ओपीडी कक्षाच्या लाईट बंद करून अंधार केला त्यामध्ये अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता हस्तगत केलेल्या लाच रकमेस व ती ठेवण्याकरीता वापरण्यात आलेल्या पांढ-या रंगाचे एफोर साईज कागदावर व लोकसेवक चकोर यांचे नमूद सॅकचे पहिल्या कप्प्यातील आतील बाजुस तसेच तक्रारदार यांचे उजव्या हाताचे बोटाचे पे-यांना तसेच त्यांनी परिधान केलेल्या पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजूस असलेल्या खिशामध्ये व खिशाचे अग्रभागी अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसून आली. त्या व्यतिरिक्त इतर कोणाचेही हातास अगर कपडयाला अँथ्रासिन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली नाही.

त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष मी लोकसेवक चकोर यांची पोशि तावरे व पोशि कुमकर यांचे मदतीने अंगझडती घेतली. तसेच त्यांचेकडील नमूद सॅकची झडती घेतली असता त्यामध्ये तक्रारदार डॉ. खैरनार यांचेविरुध्द चव्हाण नावाचे व्यक्तीने केलेला मुळ तक्रार अर्ज व त्यासोबत चकोर यांनी केलेल्या संपुर्ण चौकशीची मुळ कागदपत्रे मिळून आली. त्यामध्ये आलोसे यांनी फेरफार करून नये याकरीता ती ताब्यात घेण्यात आली. तसेच मी लोकसेवक डॉ.चकोर यांना त्यांनी स्वीकारलेली लाच रक्कम ही कोणाकरीता स्वीकारली अशी दोन्ही पंचांसमक्ष विचारणा केली असता त्यांनी साहेबांचे नावाखाली लाच रक्कम ही त्यांचे स्वत:साठीच स्वीकारल्याचे मला सांगितले. त्यानंतर मी लोकसेवक चकोर यांना त्यांचे संपुर्ण नाव व पत्ता याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव श्री ज्ञानेश्वर शिवराम चकोर, वय 50 वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी पद- क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी वर्ग-2, आरोग्य विभाग, नगररोड क्षेत्रिय कार्यालय, म.न.पा.पुणे रा.बी-206, शुभ गेट वे, विमानतळा शेजारी, विमाननगर, पुणे असे सांगितले. त्यानंतर सदर ठिकाणाचा नकाशा तयार करून व चतु:सिमा घेवून लोकसेवक डॉ.चकोर यांना पुढील कारवाईकामी ताब्यात घेतले. त्यानंतर आम्ही सर्वजण आलोसे चकोर यांचेसह त्यांचे नगररोड येथील क्षेत्रिय कार्यालयात जावून झडती घेतली. आलोसे यांचेकडून लाच रक्कम हस्तगत करतेवेळी, अंगझडतीवेळी तसेच त्यांचे कार्यालयातील झडतीवेळी पोशि कुमकर यांनी त्यांचेकडील व्हिडीओ कॅमे-याद्वारे व्हिडीओ चित्रिकरण करण्यात आलेले आहे. त्यानंतर ला.प्र.वि. पुणे कार्यालयात आलो.

त्यावेळी मी पंच क्र.1 श्री मोरे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, मी तक्रारदार असे त्यांचे ओपीडीमध्ये गेलो लोकसेवक चकोर हे लॅबवाल्या मुलाचा जबाब लिहून घेत होते त्यावेळी त्यांनी मला बाहेर थांबण्यास सांगितले म्हणून मी सदर कक्षाचे दरवाज्याला असलेल्या पारदर्शक काचेमधून दिसून अशा रितीने थांबून राहिलो. ओपीडी कक्षामध्ये लोकसेवक चकोर यांनी लॅब वाल्या मुलाचा जबाब

घेतल्यानंतर, नंतर तक्रारदार खैरनार, तक्रारदार यांच्या डॉक्टर पत्नी यांचे जबाब लिहून घेतले. त्या दरम्यान त्यांचे रजिस्टर तपासणी चालु होती. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक चकोर असे पहिल्या माळयावरील लॅबमध्ये गेले व काही वेळाने परत ओपीडी कक्षामध्ये आले. त्यावेळी त्या दोघांमध्ये चर्चा सुरू होती व त्यांचेव्यतिरिक्त ओपीडी कक्षामध्ये इतर कोणी नव्हते. त्यावेळी लोकसेवक चकोर यांनी त्यांचे हातामध्ये असलेला पांढ-या रंगाचा कागद त्यांचे डाव्या तळहातावर ठेवून समोर धरला असता तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजूस असलेल्या खिशातुन लाच रक्कम काढून लोकसेवक चकोर यांनी समोर केलल्या डाव्या हाताचे कागदावर ठेवली असता लोकसेवक चकोर यांनी सदर लाच रक्कम त्याच कागदामध्ये दुमडून त्यांचेकडील काळया रंगाचे सॅकचे पहिल्या कप्प्याची चैन उघडून त्यामध्ये ठेवल्याचे मी पाहिले. त्यावेळी तक्रारदार यांनी बाहेर माझ्याकडे पाहून त्यांचे पॅन्टचे डाव्या खिशातील हातरुमाल डाव्या हाताने बाहेर काढून तोंडावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यानंतर मी लागलीच माझ्या बाजुला काही अंतरावर बसेलेले पोशि तावरे यांना इशा-याने सांगितले असता आपण सदर ठिकाणी सापळा पथकासह येवून तपासण्या करून पकडले. अशी हकिकत पंच क्र.1 यांनी पंच क्र.2 श्री गांडेकर यांचेसमक्ष सांगितली.

त्यानंतर मी तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या हकिकतेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचेप्रमाणे मिळती-जुळती हकिकत सांगितली तसेच त्यांनी सांगितले की, पंच क्र.1 यांना लोकसेवक यांनी ओपीडी कक्षाचे बाहेर काढल्यानंतर लोकसेवक चकोर यांनी रजिस्टर तपासणी करत असताना हॉस्पिटलचे लॅबवरिल कार्यरत मुला रवि चव्हाण, त्यानंतर माझा व माझी पत्नी सौ.संध्या असे आमचे जबाब लिहून घेतले. त्यानंतर रजिस्टर तपासणी झाल्यानंतर लोकसेवक डॉ.चकोर हे मला लॅब तपासणीकामी पहिल्यामाळयावर घेवून गेले. लॅबमधील प्रिन्टरमधून एफोर साईजचा पांढ-या रंगाचा कागद घेतला. त्यावर त्यांनी मला लॅबमधील रक्ततपासणीचे मशिनचे नाव विचारून ते नाव व चाचणीचे नाव तसेच दुस-या मशिनवर करण्यात येणा-या बायोकेमस्ट्री चाचण्याची नावे त्या कागदावर लिहली. त्यानंतर आम्ही दोघे खाली ओपीडीमध्ये आलो. त्यावेळी चर्चे दरम्यान मी लोकसेवक डॉ. चकोर यांना पॅन्टच्या पाठीमागील बाजूस हाताने इशारा करून त्यांनी सांगितलेली लाच रक्कम तयार असल्याचे सांगितले त्यावेळी त्यांनी लॅबमध्ये लिहलेला व त्यांचे हातामध्ये असलेला कागद डाव्या हातावर ठेवून तो माझ्या समोर धरला व त्यावर लाचेची रक्कम ठेवा असे मला इशा-याने सांगितले असता मी माझे पॅन्टचे पाठीमागील उजव्या बाजूस असलेल्या खिशातुन लाच रक्कम काढून लोकसेवक चकोर यांनी समोर केलल्या डाव्या हाताचे कागदावर ठेवली असता लोकसेवक चकोर यांनी सदर लाच रक्कम त्याच कागदामध्ये दुमडून त्यांचेकडील काळया रंगाचे सॅकचे पहिल्या कप्प्याची चैन उघडून त्यामध्ये ठेवल्याचे मी पाहिले. त्यावेळी मी बाहेर पाहिले असता मला दरवाज्याचे काचेतुन पंच क्र.1 श्री मोरे हे दिसले त्यावेळी मी त्यांना माझा हातरुमाल पॅन्टचे खिशातुन डाव्या हाताने काढून तो तोंडावर फिरवून लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला असता आपण पंच व सापळा पथकासह येवून लोकसेवक डॉ. चकोर यांना पकडून ताब्यात घेतले. तसेच प्रस्तुत संपुर्ण सापळा कारवाईकामी दि. 21/09/2026 रोजीचे पडताळणी स्थगित कारवाई दरम्यान ध्वनिमुद्रणाकरीता, व्हिडीओ रेकॉर्डींग करीता व स्पाय कॅमेरा डिव्हॉईसमध्ये वापरण्यात आलेली तिनही मेमरीकार्ड पुढे सलग सापळा कारवाईपर्यंत वापरण्यात आलेली आहेत. सदरबाबत दि.26/09/2026 रोजीचा सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक चकोर व तक्रारदार तसेच तक्रारदार व त्यांची नर्स अर्चना वर्मा यांचेत झालेले साधे व हॉटसप कॉल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहेत.

तरी यातील तक्रारदार डॉ. दत्तात्रय जगन्नाथ खैरनार, वय 46 वर्षे, व्यवसाय – डॉक्टर, रा. धन्वंतरी हॉस्पिटल, सव्र्हे नं. 51, भैरव नगर, धानोरी, पुणे यांनी दि.21/09/2026 रोजी ला.प्र.वि. पुणे कार्यालय येथे दिलेल्या तक्रारीवरून दि.21/09/2026 रोजीचे 16.55 वाजता ते दि.22/09/2026, दि.24/06/2026 व दि. 26/09/2026 रोजीचे 13.47 वाजता दरम्यान तक्रारदार डॉ. खैरनार यांचे भैरवगनर, धानोरी, पुणे येथील धन्वंतरी हॉस्पिटल येथे केलेल्या पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान आलोसे डॉ. ज्ञानेश्वर शिवराम चकोर, वय 50 वर्षे, व्यवसाय - शासकीय नोकरी पद- क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी वर्ग-2, आरोग्य विभाग, नगररोड क्षेत्रिय कार्यालय, म.न.पा.पुणे रा.बी-206, शुभ गेट वे, विमानतळा शेजारी, विमाननगर, पुणे यांनी तक्रारदार यांचे हॉस्पिटलविरुध्द चव्हाण नामक व्यक्तिने केलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने तक्रारदार यांचेकडून यापुर्वी रु.15,000 /-लाच रक्कम स्वीकारल्याचे मान्य करून केलेल्या हॉस्पिटलचे तपासणी दरम्यान तक्रारदार यांचे हॉस्पिटलमध्ये त्रुटी दाखवून त्याबाबत कमीत-कमी कारवाई म्हणजेच वरिष्ठांना नोटीस दयायला सांगतो असे बोलून लोकसेवक डॉ. चकोर यांनी त्यांचे साहेबांचे नाव सांगुन त्यांचे स्वत:साठी रु.50,000/- लाचेची मागणी करून ती तक्रारदार यांचेकडून पंच क्र.1 श्री मोरे यांचेसमक्ष स्वीकारली म्हणून माझी आलोसे डॉ. चकोर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरिल जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी सांगितलेप्रमाणे बरोबर व खरा आहे.
समक्ष हा जबाब दिला...

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
sampatrao sahebrao raut
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): DGPSSRM7901
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

ठाणे अंमलदार

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** rajendra bausaheb p

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** pcmah82767

ठाणे अंमलदार
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन, पुणे

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**